# बाल न्याय अधिनियम (काळजी व संरक्षण) 2015

**हा कायदा कुणासाठी**

- वय वर्षे अठरा खालील बालकांसाठी ती मुलगा किंवा मुलगी,
- विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी– वय 7 ते 18 वर्षातील बालक, ज्याने गुन्हा केला असे अभिकथीत (शक्यता) आहे,
- काळजी संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी– 0 ते 18 वर्षातील बालक ज्या बालकाचे पालन, पोषण करणारे कुणी नाही

**बाल न्याय मंडळ**– विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी जिल्हास्थरावर कार्यरत असते,

- **वय**– सात ते अठरा वर्षाखालील बालक (मुलगा किंवा मुलगी) ज्याने गुन्हा केला असे अभिकथीत (शक्यता) आहे, अशा बालकांविषयी निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार बाल न्याय मंडळास आहे.
- **बाल न्याय मंडळामध्ये**– 1 प्रथमश्रेणी न्याय दंडाधिकारी व 2 सामाजिक कार्यकर्ते असतात.
- **कर्तव्य, जबाबदारी व भुमिका**– विधी संघर्षग्रस्त बालकाची काळजी, संरक्षण व विकासात्मक गरजांची पुर्तता करणे तसेच प्रकरणाची चौकशी, निकाल व पुनर्वसन
- **दिवस**– दर सोमवार, शुक्रवार
- **वेळ** – 11 ते 2 पर्यत
- **पत्ता** – शासकिय मुलांचे निरीक्षण गृह, सिध्देश्वर भवन, चापनवाडी, यवतमाळ

**– काही महत्वाचे –**

- पोलींसानी बालकाला ताब्यात घेतल्यास 24 तासांच्या आत बाल न्याय मंडळासमोर सादर करणे गरजेचे आहे.
- बालक पोलीसांच्या ताब्यात असतांना त्याला हाथकडी लावणे, मारहाण करणे किंवा पोलीस कोठडी, जेल मध्ये ठेवण्यास मनाई आहे.
- बालक पोलीसांच्या ताब्यात असतांना त्याच्या पालकांना व परीविक्षा अधिकारी यांना कळविणे बंधनकारक आहे.

बालकाची जमानत नाकारल्यास– निरीक्षण गृहात तात्पुरती व्यवस्था केल्या जाईल,

किंवा

बालकाची जमानत झाल्यास– सक्षम पालकासमवेत, सुरक्षीत ठिकाणी ठेवण्यात येईल

बालकांच्या प्रकरणात बाल न्याय मंडळ जमानत नाकारतात जर,

बालक
– सराईत गुन्हेगाराच्या संपर्कात येत असेल तर,
– शारीरीक, मानसिक व नैतीक धोका तर,
– न्यायाचे उदिष्ठ निष्फळ ठरत असेल तर.

---

**बाल कल्याण समीती** – काळजी आणी संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी जिल्हास्थरावर कार्यरत

- **वय**– 0 ते अठरा वर्षाखालील बालक (मुलगा किंवा मुलगी) ज्यास काळजी व संरक्षणची गरज आहे, अशा बालकांविषयी निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार बाल कल्याण समीतीस आहे.
- **बाल कल्याण समीती मध्ये**– 1 अध्यक्ष व 4 सदस्य समीती असतात.
- **कर्तव्य, जबाबदारी व भुमिका**– काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची काळजी, संरक्षण व विकासात्मक गरजाची पुर्तता करणे तसेच प्रकरणाची चौकशी, निकाल व पुनर्वसन
- **दिवस**– दर सोमवार, बुधवार, शुक्रवार
- **वेळ** – 04 ते 06 पर्यत
- **पत्ता** – शासकिय मुलांचे निरीक्षण गृह, सिध्देश्वर भवन, चापनवाडी, यवतमाळ
-

## काळजी आणी संरक्षणाची गरज असलेली बालक कोण ?

मुल म्हणजे 0 ते 18 वयोगटातील मुलगा किंवा मुलगी ज्यामध्ये

1. ज्यास राहण्याचे घर अथवा ठिकाण नाही.
2. रस्तेवर राहणारी, काम करणारी, भिक मागणारी मुले
3. मुल अशा एखादया व्यक्ती बरोबर राहत असेल –
   - ज्या मुलास ठार मारण्याची इजा पोहचवण्याची धमकी दिली असेल आणी त्या व्यक्ती व्दारे त्या धमकीचे पालन करण्याची शक्यता असेल.
   - इतर कोणत्याही मुलास त्यांन ठार मारले असेल, शिवीगाळ केली असेल, दुर्लक्षीत केले असेल
   - मुलावर लैंगीक अत्याचार, पिळवणूक इजा व त्यास जिवे मारण्याची शक्यता असेल,
4. मानसिक व शारीरिक दृष्टया विशेष गरजा असलेली
5. दुर्धर आजाराने ग्रस्त असलेली मुले व त्याचे पालक सक्षम नसलेली
6. ज्याचे पालक काळजी घेण्यास असमर्थ आहे अशी
7. पालक नसलेली, सोडुन दिलेली, सापडलेली
8. लैंगिक अत्याचाराच्या उद्‌देशाने पिळवणुक होत असलेली
9. असुरक्षीत रित्या सापडलेली, ज्याची बेकासदेशीर वाहतूक होण्याची शक्यता असलेली, व्यसनाने ग्रस्त असलेली
10. बेकायदेशीर कामासाठी उपयोग अथवा वापर होत असलेली
11. नैसर्गीक किंवा मानवनिर्मीत आपत्तीने बाधीत,
12. ज्याचा बाल विवाह होण्याची शक्यता आहे

## कोण व्यक्ती बाल कल्याण समीती समोर मुल सादर करू शकेल ?

1. कोणताही पोलीस अधिकारी(विशेष बाल पोलीस पथक, बाल कल्याण पोलीस अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, कामगार कायदा अधिकारी )
2. सामाजिक कार्यकर्ता,
3. कोणताही लोकहितेशी नागरीक
4. परीविक्षा अधिकारी व बाल कल्याण अधिकारी
5. कोणत्याही दवाखान्यातील कर्मचारी, नर्स व डॉक्टर
6. चाईल्ड लाइन, स्वयंसेवी संस्था
7. बाल स्वताः देखील

### या नवीन कायद्यातील बदल

- 16 वर्षपुर्ण झालेला बालक जर गंभीर गुन्हयात सहभागी झाला असेल तर अश्या बालकांचे प्रकरण बाल न्यायालया मध्ये बाल न्याय मंडळाच्या आदेशाने मोठया व्यक्ती प्रमाणे चालविल्या जावु शकेल.
- गंभीर गुन्हयातील बालक जर बाल न्यायालयामध्ये चौकशी दरम्यान दोषी आढळल्यास तो शासकिय नोकरी मिळवण्यास अपात्र समजल्या जाईल.
- बालकांचा बेकायदेशीर कृत्यासाठी वापर करणारी व्यक्ती कठोर कारावास व शिक्षेस पात्र समजल्या जाईल


Resource Cell For Juvenile Justice

आधिक माहितीसाठी संपर्क साधा

रिसोर्स सेल फॉर जुवेनाईल जस्टीस– यवतमाळ,

( बाल न्याय मंडळ, यवतमाळ यांच्याशी संलग्नीत)

261, अ, दर्डा नगर, यवतमाळ,

संपर्क– देवेन्द्र 8888460260, प्रशांत 9049728021, संतोष 9049835593

भविष्य की पुनर्कल्पना RE-IMAGINING FUTURES TISS